कृषिशिक्षण

# कृषी क्षेत्रातील अपेक्षित प्रगतीकरिता कृषी व्यवसाय व्यवस्थापन अभ्यासक्रम आवश्यक




प्रा. प्रवीण जगताप
(मो.नं. ९९७५७६५७०१)
प्रा. अमोल डेर्ले
क.का. वाघ कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नाशिक


कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते आणि कृषी व कृषी आधारित घटकांचा समावेश अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्रात केला जातो. हे क्षेत्र देशाच्या एकूण 'जीडीपी'मध्ये सुमारे १७ टक्के योगदान देते. तसेच अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण उद्योगक्षेत्र व सेवाक्षेत्र यांना ते प्रभावित करत असते.

देशामधील शेतीक्षेत्राची वाटचाल पारंपरिक शेतीपासून व्यावसायिक शेतीकडे बऱ्याच अंशी झाली आहे व येथून पुढची वाटचाल ही मूल्यवर्धित शेतीकडे केल्यास शेती क्षेत्रातील उत्पादन व उत्पन्नवाढीच्या अगणित संधी आहेत. आजच्या कृषिक्षेत्रासमोर विविध आव्हाने आहेत तसेच संधीही उपलब्ध आहेत. त्यामध्ये प्रक्रियायुक्त पौष्टिक अन्नपदार्थांची मागणी, सेंद्रिय पद्धतीने उत्पादन व प्रक्रियायुक्त कृषिमालाची मागणी, निर्यातक्षम कृषी उत्पादन, करार शेती, कृषी तंत्रज्ञानाधारित स्टार्टअप उभारणी, कृषी उद्योग उभारणी, कृषी क्षेत्रासाठी विविध सेवा पुरवणे, कृषी शिक्षण व इतर कौशल्य प्रदान करणाऱ्या संस्थांची उभारणी, कृषी वित्तपुरवठा इत्यादींचा समावेश आहे.



या संधीचा व्यावसायिकपणे लाभ घेण्याकरिता योग्य व्यवस्थापन कौशल्याने समृद्ध अशा मनुष्यबळाची या क्षेत्रात अत्यंत गरज आहे. किंबहुना या क्षेत्रातील सार्वजनिक, खासगी आणि सहकारी संस्था अशा व्यवस्थापकांच्या शोधात असतात. सध्या भारतात सहा हजारांहून अधिक शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. परंतु योग्य व्यवस्थापन कौशल्याच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन व उत्पन्न वाढीमध्ये अपेक्षित बदल करण्यास त्या अकार्यक्षम आहेत. तसेच योग्य व्यवस्थापन कौशल्याच्या अभावी देशभरातील असंख्य कृषी व कृषी आधारित उद्योगांना गुंतवणुकीच्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होत नाही.

जागतिकीकरणामुळे प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे वेगाने बदल होत आहेत. यात कृषिक्षेत्र सुद्धा समाविष्ट आहे. या स्पर्धात्मक वेगाने बदलणाऱ्या व्यावसायिक जगात प्रत्येक साधन, उपक्रम, संस्था आणि प्रत्येक प्रकल्प टिकून राहाण्यासाठी व समृद्ध होण्यासाठी त्यांचे व्यावसायिकपणे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने कृषी क्षेत्रात अपेक्षित यश प्राप्त करण्याकरिता व्यवस्थापन कौशल्यांनी परिपूर्ण असे मनुष्यबळ दिशादर्शक व लाभदायक ठरू शकते. याकरिता कृषी व्यवसाय व्यवस्थापन हा अभ्यासक्रम लोकप्रिय होत आहे. किंबहुना हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या मनुष्यबळाची मागणी खासगी व सहकारी उद्योग संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर होत आहे. सद्य:स्थितीत राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व्यवसाय व्यवस्थापनाचा पदवी अभ्यासक्रम सुरू आहे. तसेच या विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम कृषी विद्यापीठांबरोबर देशातील भारतीय प्रबंधन संस्थांसारख्या विविध नामांकित संस्था राबवितात. ■